नि.दि.दावा क्र. ८/२०२४
दुस्यंतकुमार वि. सुग्रताबाई
निशाणी क्र. ४३

प्रतिवादीतर्फे साक्षीदार क्र. १ दुस्यंतकुमार
मी शपथेवर सांगतो की,

उलटतपास प्रतिवादीतर्फे विद्वान विधीज्ञ श्री.एन.एम.जिभकाटे यांच्यातर्फे शपथेवर सुरु-

४. माझी आई गृहिनी आहे. माझे वडील तलाठी म्हणुन निवृत्त झाले आहेत. माझे वडील नागपुर आणि कामठी येथे तलाठी म्हणुन कार्यरत होते आणि कार्यरत असतांना ते त्या-त्या ठिकाणी राहत होते. शिरसोली-तांडा येथे माझ्या वडीलांची वडीलोपार्जित जमिन होती. प्रतिवादी क्र.२ देवचंद उपासराव चापले हे शिरसोली येथेच राहतात. प्रतिवादी क्र. १ कुठे राहते याची मला माहिती नाही. प्रतिवादी क्र.१ कुठे राहते याची मी कधीही चौकशी केली नाही. प्रतिवादी क्र.२ यांना बहिण असल्याबाबत मला माहित नाही. सन १९९९ सालातील व्यवहाराबाबत मला कोणतीही माहिती नाही, कारण मी लहान होतो. दाव्यातील नमुद केलेल्या घटनाबाबत मला प्रत्यक्ष माहिती नाही. हे म्हणणे खरे आहे की दाव्यातील माहिती मला कोणामार्फत समजली, याचा उल्लेख मी दाव्यात केला नाही. शिरसोली गावापासुन कोदामेढी हे अंदाजे ३ कि.मी. अंतरावर आहे.

५. फेरफार हा सन २००१ मध्ये झाला तो माझ्या वडीलांनी केला. तलाठी यांनी कोणाकोणाला नोटीस पाठविली याची मला कल्पना नाही. हे मला माहित नाही की मी खरेदी केलेली मिळकत ही प्रतिवादी क्र.२ यांची वडीलोपार्जित मिळकत होती. प्रतिवादी क्र.१ ही प्रतिवादी क्र.२ ची बहिण असल्याचे मला, तहसिल कार्यालयातुन नोटीस आल्यानंतर समजले. प्रतिवादी क्र.१ ला कधीही कायदेशीर नोटीस पाठविली नाही. प्रतिवादी क्र.२ ला देखिल माझी फसवणुक केली म्हणुन नोटीस पाठविली नाही. सन २०२० ला नोटीस मिळाल्यानंतर मला तलाठयाकडुन समजले. त्यानंतर मी सर्व

माहिती काढली. हे म्हणणे खरे आहे की तलाठयाची नोटीस आल्यानंतर मला प्रतिवादी क्र.१ ने दाखल केलेल्या वाटपाच्या दाव्याची माहिती समजली. हे म्हणणे खरे आहे की दावा मिळकत पुर्वी सन १९९७-९८ मध्ये वर्ग-२ ची होती. दावा मिळकत विकत घेण्यापुर्वी परवानगी घेतली होती किंवा नाही याबाबत मला माहित नाही. हे म्हणणे खरे नाही की मी दाव्यात केलेले कथन खोटे आहे. हे म्हणणे खरे नाही की खोटया माहितीच्या आधारे खोटा दावा दाखल केलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की मी तलाठयाकडे नोंदविलेली हरकत ही खोटी आहे. हे म्हणणे खरे नाही की प्रतिवादी क्र.१ चा दावा हा बरोबर होता. हे म्हणणे खरे नाही की तलाठयाने प्रस्तुत दाव्यात नमुद केलेल्या पत्राच्या आगोदर चार-पाच वेळा पत्र पाठविले होते परंतु मी त्यानुषंगाने कोणतीही कारवाही केली नाही. हे म्हणणे खरे नाही की दावा हा मुदत बाहय आहे.

उलटतपास पुर्ण.

श्रवणोत्तर स्वीकृत

माझे समक्ष

SARODE SANDEEP MARUTI

L.A.R. No. 106-2005
Digitally signed by SARODE SANDEEP MARUTI
Location: Ramtek
Date: 2025.10.10 12:24:55 +0530

(एस.एम. सरोदे)

दिवाणी न्यायाधीश व. स्तर,

रामटेक

दिनांक ९.१०.२०२५

रामटेक

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. file of evidence are same word to word as per original evidence.

Name of Stenographer : R. J. Khobragade (Gr.-II)